

# -: जगद्गुरु संत तुकाराम महाराज :-

संत तुकाराम महाराजांचे मूळ पुरुष 'श्री विश्वंभरबाबा' हे श्री पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होते. यांचे मूळ गांव महाबळेश्वराच्या पायथ्याशी असलेले प्रसिद्ध खोरे म्हणजे जावळी हे होते. चंद्रगुप्त मौर्याचे क्षात्रघराणे पुढे 'मोरे' या नांवाने रूढ झाले. त्यांच्या घराण्यामध्ये पांडुरंगाची सेवा चालू होती. त्याप्रमाणे एकदा कार्तिकी वारीस बाबा गेले असतां, श्रीपांडुरंगाच्या दर्शनाने इतके मोहित झाले की, त्यांनी कार्तिकी ते आषाढी पर्यंत १६ वाऱ्या केल्या. पुढे त्यांनी दर महिना पायी वारी सुरू ठेवली आणि श्रीपांडुरंगाची सेवा केली त्या सेवेचे फळ म्हणजे आजही स्वयंभू श्री पांडुरंग रुक्मिणीच्या मूर्ती देहूतील मंदीरांत विराजमान असून देहू प्रतीपंढरी मानली जाते. आता सुद्धा देहूच्या परीसरांतील भाविक वारीस देहूत येत असतात. श्रीविश्वंभर बाबांची पत्नी 'आमाई' यांना 'हरि' व 'मुकुंदा' नावाची दोन मुले होती. पुढे हरी आणि मुकुंदा हे सैन्यात भरती झाले व एका युद्धात वीरमरण पावलेले, त्याचे आमाईला खूप दुःख झाले. पुढे आमाई तिची सून व तिचा मुलगा विठ्ठल हे पांडुरंगाची सेवा करू लागले पुढे विठ्ठलचा मुलगा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकरचा कान्हया व कान्हयाचा पुत्र 'श्री बोल्होबा' म्हणजेच श्री तुकोबारायांचे वडील होते. अशा तऱ्हेने सात पिढ्यांची अविरत सेवा होऊनच श्रीतुकोबारायांसारख्ये महापुरुष या घराण्यात अवतरले. तो दिवस होता माघ शुद्ध पंचमी शके १५३० (सन १६०८). श्रीबोल्होबा व त्यांची पत्नी 'कनकाई' याना एकूण तीन पुत्रे होती मोठे

‘सावजी’, दुसरे ‘श्री तुकोबाराय’, लहान ‘कान्होबाराय’ ही तिन्ही मुले परमार्थिक व साधुवृत्तीचे होते.

कौटुंबिक माहिती - श्रीतुकोबारायांचा विवाह वयाच्या ११ व्या वर्षी लोहगावच्या मोझे घराण्यातील ‘रखुमाईबाई’ यांच्याशी झाला. त्यांना सतत दम्याचा आजार असल्याने श्रीबोल्होबा महाराजांचे वयाचे १३ वर्षी आप्पाजी गुळवे (पुणे) यांची कन्या जिजाई म्हणजेच आवडी किंवा आवली यांच्याशी दुसरा विवाह लावला. श्री तुकोबारायांना तीन पुत्र झाली मोठे ‘महादेव’, मधले ‘विठोबा’ व लहान ‘नारायण’ महाराज व कन्या ‘भागीरथी’. वडील बंधू सावजी विरक्त असल्याने प्रपंचाची जबाबदारी श्रीतुकोबारायांवर आली. याप्रमाणे वयाच्या १७ वर्षापर्यंत त्यांचे जीवन सुखसमृद्धीत व समाधानांमध्ये गेले. पण पुढे वयाचे १७ वर्षांचे महाराजांचे पिताजी श्रीबोल्होबा महाराज हे अचानक वैकुंठवासी झाले व ते पोरके झाले. श्रीतुकोबांवर संकटांची मालिकाच सुरु झाली. पुढील वर्षी सावजींची पत्नी ही गेली. वडीलबंधु विरक्त असल्याने निघून गेले व धाकटा वयाने लहान असल्याने सर्व जबाबदारी एकट्या श्रीतुकोबांवर आली. दुर्दैवाने याच वेळेस संपूर्ण महाराष्ट्रावर एक दैवी आपत्ती आली ती म्हणजे दुष्काळ. शके १५५० (सन १६२९) या दुष्काळात व्यापार बसला, गुरे ढोर मेली आणि ज्येष्ठ पत्नी रखुमाई व पुत्र संताजी यांचे निधन झाले.

परमार्थिक जीवन-

श्री तुकोबारायांना साक्षात्कार देहूच्या उत्तरेस असणाऱ्या भामचंद्र पर्वतावर झाला महाराज म्हणतात.

भामगिरीपाठी वस्ती जाण केली । वृत्ती स्थिरावली परब्रह्मी ।।1।।

पंधरा दिवसामाजी साक्षात्कार झाला । विठोबा भेटला निराकार ।।

गुरूपदेश व परंपरा -

श्री तुकोबारायांना गुरूपदेश स्वप्नामध्ये शके १५५४ माघ शुद्ध दशमीला गुरुवारी झाला.

माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।

गुरुपरंपरा-राघवचैतन्य-केशवचैतन्य-बाबाजीचैतन्य-श्रीतुकोबारायचैतन्य ।।

बाबाजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरी।।

नित्यक्रम एकांतवास व यात्रा -

श्री तुकोबारायांचा काहीकाळ नित्यक्रम असा होता प्रात:काळी इंद्रायणी स्नान, श्रीपांडुरंगाच्या देवळात पूजा-अर्चा करणे. एकांतवासात भामचंद्र, भंडारा किंवा घोरवडेश्वर जाऊन ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, संत नामदेव महाराजांची गाथा, संत कबीर महाराजांची गाथा आणि अजूनही संतांचे ग्रंथ व वेदांत पुराणे पारायण तसेच ग्रंथाचे पाठांतर होण्यासाठी तुकोबारायांना वर कष्ट लागत नसत रात्रंदिवस मनन करून ग्रंथातील अक्षरे सहज मुखोद्गत होत होती. नामस्मरण व कीर्तन करत आषाढी-कार्तिकीची वारी आळंदी क्षेत्र जवळच चार कोसावर होते त्यांची ज्ञानेश्वर माउलींच्या चरणी निष्ठाही मोठी होती यामुळे आळंदीस तेवा वारंवार जात. निवृत्तीनाथांची समाधी त्र्यंबकेश्वरी आहे, चांगदेवांची पुणतांब्यास आहे व पैठण नाथांचे क्षेत्र प्रसिद्धच आहे आणि ही तीनही क्षेत्रे गोदातीरी आहेत तेव्हा वारकऱ्यांच्या मेळ्याबरोबर या ही क्षेत्री वारीला जात असे.

निर्याण -

शके १५७१ फाल्गुन वद्य द्वितीयेला संत श्रीतुकोबारायांचे निर्याण झाले.

प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें । कलिच्या काळामाजीं अदभुत वर्तविले ।

मानवदेह घेऊनि निजधामा गेले । निळा म्हणे सकळ संत तोषविले ।।

- तुकाराम महारज यांचे वंशज
श्री. अनिकेत मोरे महाराज देहुकर.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - चि. श्रेयस पाटसकर.
२. संत तुकाराम - श्री. सतीश कदम.
३. आवडी - सौ. स्वप्नजा बर्वे.

नेपथ्य -

१. श्री. महेश पुजारी.
२. श्री. सर्वेश उमराणी.

३. श्री. के. एन. देसाई सर.

लोकेशन -

बिरोबा मंदिर, विजयनगर, कराड

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. आमित पाटील.

२. श्री. सर्वेश उमराणी.

३. श्री. गणेश सावंत.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्‌वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - श्री. तुकाराम महारज यांचे वंशज श्री. अनिकेत मोरे महाराज देहुकर.
- लेख संकलन -

-श्री. दीपक आफळे.

- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -